# नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी

## प्राचार्य डॉ. केशव फाले गौरवग्रंथ



। संपादक ।

प्राचार्य डॉ. गजानन जाधव

# नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी

**प्राचार्य डॉ. केशव फाले गौरवग्रंथ**

संपादक
प्राचार्य डॉ. गजानन जाधव

'नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी'
भेट प्रत
प्राचार्य डॉ. केशव फाले गौरवग्रंथ समिती

अनघादित्य
प्रकाशन

- नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी : डॉ.केशव फाले गौरव ग्रंथ
संपादक : प्राचार्य डॉ. गजानन जाधव
- Navvadottar Marathi Gramin Kadambari : Dr. Keshao Phale Gaurav Granth
Edited by : Prin. Dr. Gajanan Jadhav

- © संपादक

- **प्रकाशक :**
सौ.चित्रा प्रमोद गारोडे,
अनघादित्य प्रकाशन,
'कमलकुंज', २९, गोवर्धन विहार,
परतवाडा, जि. अमरावती
भ्रमणभाष : ९४०५४२७०६२
anaghadityapublication@gmail.com

- **प्रथमावृत्ती :** १५ ऑक्टोबर, २०२१ (विजयादशमी
- ISBN-978-93-92872-00-6

- **मुखपृष्ठ :** डॉ.विशाल इंगोले, लोणार

- **अक्षर जुळवणी व मांडणी :** श्री. नारायण पाझाडे,
यश मल्टी सर्व्हिसेस, जुना जालना, जालना
भ्रमणभाष : ९४२३४५७०३७
imagepagesetters@gmail.com

- **छपाई :** प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.,
जी-१२, एम.आय.डी.सी.,
चिकलठाणा, औरंगाबाद
printwell@gmail.com

- **मूल्य :** ४००/-

---

१. या ग्रंथातील लेखकांच्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतील असे नाही.
२. या पुस्तकाचे, पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण, फोटोकॉपींग, रेकॉर्डींग अथवा कॉपीराईटचा भंग होईल असे कुठल्याही प्रकारचे वर्तन संपादकाच्या लेखी परवानगी शिवाय करता येणार नाही. सर्व हक्क सुरक्षित आहेत.

## संपादक मंडळ

### संपादक

प्राचार्य डॉ. गजानन जाधव

### सहसंपादक

| | |
|---|---|
| डॉ. गजानन मुंधे | डॉ. ममता इंगोले |
| डॉ. संतोष चतुर | डॉ. विष्णू लांडे |
| प्रा. अतुल सारडे | डॉ. अनंत सूर्यकार |
| डॉ. नंदकुमार भाकरे | डॉ. पांडूरंग जाधव |
| डॉ. तुकाराम कांबळे | प्रा. प्रमोद धनविजय |


---

### प्राचार्य डॉ. केशव फाले सेवागौरव सोहळा आयोजन समिती

| | | |
|---|---|---|
| डॉ. गजानन जाधव | डॉ. ममता इंगोले | डॉ. गजानन मुंधे |
| डॉ. पवन मांडवकर | डॉ. मोना चिमोटे | डॉ. प्रफुल्ल गवई |
| डॉ. अशोक देशमुख | डॉ. अशोक देवरे | डॉ. मधुकर गावंडे |
| डॉ. दिवाकर इंगोले | डॉ. नीलकंठ इंगळे | डॉ. रविकिरण पंडित |
| डॉ. अलका गायकवाड | डॉ. वर्षा चिखले | डॉ. काशीनाथ बऱ्हाटे |
| डॉ. गणेश माल्टे | डॉ. अविनाश घरडे | डॉ. अनंत सूर्यकार |
| डॉ. गोविंद गायकी | डॉ. सुभाष गव्हाणे | डॉ. सुनिल राठोड |
| प्रा. पंढरीनाथ चोपडे | डॉ. भाऊराव तनपुरे | डॉ. नंदकिशोर उगले |
| श्री. श्रावण फाले | डॉ. पांडूरंग जाधव | डॉ. संतोष चतुर |
| डॉ. विष्णू लांडे | प्रा. अतुल सारडे | डॉ. नंदकुमार भाकरे |
| डॉ. पुरुषोत्तम बांडे | डॉ. रमेश खंडारे | डॉ. तुकाराम कांबळे |
| प्रा. प्रमोद धनविजय | प्रा. मालिनी पवार | प्रा. शोभा पवार |
| प्रा. सुनिल सावंत | प्रा. उमेश दहातोंडे | प्रा. सुधीर लाहे |

सर्व कर्मचारीवृंद कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरीअरब, जि. यवतमाळ

## ■ अनुक्रमणिका

**भाग : एक**


■ **प्रकाशकाचे दोन शब्द...** /सहा

■ **संपादकीय...** /सात

१) **नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी : संकल्पना आणि स्वरूप**
- डॉ. नागनाथ कोत्तापल्ले/१४

२) **नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी : आविष्कार तंत्रे आणि शैली**
- डॉ. किशोर सानप/३५

३) **महात्मा जोतीराव फुले आणि नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी**
- डॉ. प्रल्हाद लुलेकर/९१

४) **नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरीतील भूमिके**
- डॉ. अशोक राणा/११४

५) **नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतील राजकीय अवकाश**
- डॉ. प्रमोद मुनघाटे/१४१

६) **नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीची शैली**
- डॉ. महेंद्र कदम/१५३

७) **नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरी : एक आकलन**
- डॉ. शंकर विभुते/१७१

८) **नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतील भटक्या विमुक्तांचे जीवन**
- डॉ. गिरीश मोरे/१८४

९) **बदलते ग्रामवास्तव आणि नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरी**
- डॉ. अरुण शिंदे/१९६

१०) **जागतिकीकरण आणि नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी**
- डॉ. गणेश मोहिते/२११

११) **नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतील संस्कृतीभान**
- डॉ. केदार काळवणे/२२७

१२) **नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरीतील कृषिशोषितांचे जग**
- डॉ. दत्ता घोलप/२४५

१३) **नव्वदोत्तर वैदर्भीय मराठी ग्रामीण कादंबरी**
- डॉ. सतीश तराळ/२६२

१४) **नव्वदोत्तर गोमंतकीय मराठी ग्रामीण कादंबरी**
- प्रा. विनय बापट/२७१

१५) **नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी : लोकतत्त्व आणि समाजजीवन**
- डॉ. भाऊसाहेब गव्हाणे/२८३
१६) **शेतकरी आत्महत्या आणि नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी**
- डॉ. काशीनाथ बऱ्हाटे/२९८
१७) **नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरीतील जातवास्तव**
- डॉ. मारोती कसाब/३०५
१८) **नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्रीचित्रण**
- डॉ. छाया तांबे (बारवे)/३१४

**भाग : दोन**

१) **डॉ. केशवराव फाले : बालमित्र ते प्राचार्य**
- श्रावण विठ्ठलराव फाले/३३०
२) **प्राचार्य डॉ. केशव फाले : निर्मळ मनाचे व्यक्तिमत्त्व**
- प्रा. संजय टिकार/३३९
३) **डॉ. केशवराव फाले : निरंतर कर्मभावनेचा वसा**
- प्रा. पंढरीनाथ चोपडे/३४२
४) **प्रेरणेचा अखंड उर्जास्त्रोत : प्राचार्य डॉ.केशव फाले**
- डॉ. भाऊराव तनपुरे/३४६
५) **आजीवन माय मातीशी नातं जपणारे : डॉ.केशवराव फाले**
- डॉ. नंदकिशोर उगले/३५१
६) **सर्वोत्तम मार्गदर्शनाचा अखंड झरा : डॉ.केशवराव फाले**
- डॉ. राम बुटले/३५५
७) **डॉ. केशवराव फाले : एक उत्कृष्ट प्रशासक**
- सतीश राऊत/३६०

**लेखक परिचय**/३६३

□□□

# नव्वदोत्तर गोमंतकीय मराठी ग्रामीण कादंबरी

प्रा. विनय बापट

१८८६ मधील सूर्याजी सदाशिव महात्मे यांची 'वेषधारी पंजाबी' ही गोमंतकात लिहिली गेलेली पहिली कादंबरी म्हणून सांगितली जाते, हा काळ लक्षात घेतल्यास समकालीन मराठी कादंबरी बरोबरच गोमंतकीय मराठी कादंबरीच्या लेखनालाही सुरुवात झाली हे आपल्या सहज लक्षात येते. म्हणूनच, गोमंतकीय मराठी कादंबरीच्या अभ्यासक डॉ. विद्या प्रभुदेसाई यांचे ''गोमंतकीय मराठी साहित्य हे केंद्रवर्ती मराठी साहित्याच्या मागोमाग जाणारे असल्याने केंद्रवर्ती मराठी कादंबरीचा प्रभाव गोमंतकीय मराठी कादंबरीवर दिसतो.''[१] हे मत सहज मान्य करता येण्यासारखे आहे. केंद्रवर्ती साहित्याचा प्रभाव गोमंतकीय मराठी कादंबरीवर असला, तरी गोमंतकीय मराठीत कादंबरीचा विचार करीत असताना अनेक अभ्यासकांनी गोमंतकीय कादंबरीचा प्रादेशिक कादंबरीच्या संदर्भात विचार जास्त स्वरूपात केल्याचे दिसते. विशेषतः वि. स. सुखटणकर यांनी 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' या आपल्या कथासंग्रहाचा उल्लेख प्रादेशिक कथासंग्रह अशा स्वरूपात केल्यानंतर, गोमंतकीय साहित्याचा प्रादेशिक साहित्याच्या संदर्भात जास्त विचार केला गेला.

आजपर्यंत गोमंतकीय कादंबरी संदर्भात तिचा ग्रामीण कादंबरी म्हणून कोणीच अभ्यास केलेला नाही, कारण गोमंतकीय कादंबरी लेखनासंदर्भात प्रादेशिकतेच्या सीमा ओलांडून वेगळा विचार करण्याची गरज कोणाला जाणवली नव्हती. नव्वदोत्तर काळात ज्याप्रमाणे संपूर्ण मराठी प्रांतात ग्रामीण कादंबरीने मूळ

धरले आहे व आज मराठी कादंबरीचा विचार करता तो महत्त्वाचा प्रकार म्हणून पुढे आला आहे ते पहाता, गोमंतकीय लेखकांनी नव्वदोत्तर काळात जे लेखन केले आहे त्याचा ग्रामीणतेच्या अंगाने विचार करणे अपरिहार्य आहे. काही निवडक कादंबऱ्यांच्या विश्लेषणांतून नव्वदोत्तर गोमंतकीय मराठी ग्रामीण कादंबरीचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**निसर्ग आणि माणसांच्या उद्ध्वस्ततेची कहाणी 'ओरबिन'**

'ओरबिन' ही अगदी अलिकडच्या काळात खाण उद्योगामुळे उद्ध्वस्त झालेल्या एका पंचक्रोशीचे चित्रण करणारी कादंबरी आहे. या अगोदरही गोमंतकातील खाण जीवनामुळे उद्ध्वस्त झालेल्या एका गावचे चित्रण करणारी कादंबरी 'उद्ध्वस्त' या नावाने सुभाष भेंडे यांनी लिहिली होती. रा. का. बर्वे यांची 'होमकांड' ही देखील खाण जीवनावरीलच कादंबरी आहे. पण ओरबिन यापेक्षा वेगळी आहे, ती तिच्या रचना कौशल्यामुळे. या कादंबरीला कोणीच नायक नाही. फक्त पंचक्रोशी आणि खाण उद्योग सुरू झाल्यानंतर त्या पंचक्रोशीतील लोकांच्या बदलत्या जीवनक्रमाचे चित्रण करत, एका कोसळणाऱ्या ग्रामजीवनाचे लेखकाने अत्यंत तटस्थपणे वर्णन केले आहे आणि हेच या कादंबरीचे वेगळेपण आहे. ज्या गावांत लोकांचे दोन वेळा खाण्याचे वांदे होते त्या लोकांना उपजाविकेचे एखादे भक्कम साधन सापडणे हे मृगजळातील पाण्यासारखेच होते. त्यामुळे या खाणींना तसा विरोध होण्याचे कारणच नव्हते. पण हळूहळू पंचक्रोशीचे उद्ध्वस्तपण लेखकाने अत्यंत सूचकपणे सुचवले आहे. मुळगावात बऱ्याच पिढ्या ज्याच्या गेल्या त्या विनायक गोडसेच्या कुळागरातील वर्षानुवर्षे वाहणारा गरम पाण्याचा झरा आटणे आणि पाण्याचा प्रवाह बदलल्याने कुळागराची झालेली वाताहात ही सुरुवात आहे. हे उद्ध्वस्तपण निसर्गाचं आहे तसेच मानवी मूल्यांचे उद्ध्वस्तपण मनाला जास्त चटका देणारे आहे. पैसा माणसाला हेकेखोर, गर्विष्ठ आणि भावनाशून्य बनवतो याची अनेक उदाहरणे या कादंबरीत सापडतात. पण हा येणारा पैसा आटला की तोच माणूस किती दीन आणि लाचार होतो त्याचीही अनेक उदाहरणे यात सापडतात. बाहेरचे लोक गावात वस्तीला आल्याने वाढलेली गुंडगिरी, नवीन व्यवसायामुळे पारंपरिक शेती व्यवसायाकडे लोकांचे होणारे दुर्लक्ष आणि शेती-बागायती करण्यासाठी जमीनच उपलब्ध नसणे, अनैतिक संबंधात होत जाणारी वाढ, कुटुंबातील सदस्यांत वाढत जाणारा दुरावा, वाढलेली व्यसनाधिनता, हळूहळू क्षयासारख्या रोगाने सर्वत्र पसरलेले हातपाय या सर्वांचे हृदयस्पर्शी वर्णन यात आहे. एकदा खाणीतील माल संपत आल्यावर आपला नफा

घेऊन लोकांना त्यांच्या कर्मावर सोडून जाणारे खाणमालक आपणाला आजच्या जगाचे खरे रूप दाखवतात. या सर्वांचे चित्रण लेखकाने अत्यंत थंडपणाने पण तेवढ्याच भेदकतेने घडविले आहे.

गावाची पारंपरिक मानसिकता अगदी नेमकेपणाने चितारण्यात लेखक कमालीचा यशस्वी झाला आहे. गावातील भुताखेतांबद्दलचे समज आणि त्या संदर्भात घडलेल्या घटनांतून कादंबरीतील ग्रामीण संवेदना नेमकेपणाने व्यक्त होते. बैल आजारी पडला म्हणून चिंतीत होणारी आणि तो मेल्याने अतीव दुःखी झालेली शेवंता एकूणच पारंपरिक शेतकरी महिलेची प्रातिनिधिक रूप म्हणून आपल्यासमोर येते. या कादंबरीत आलेल्या अनेक दंतकथा या कादंबरीतील लोकसंस्कृती अधिक ठळकपणे अधोरेखित करतात. "आरे, चेडू म्हणजे कुसको म्हाल, कुसच्या पयली तो भायर काडपाक जायो"[२] या प्रकारच्या संवादातून गावजीवनांतील स्त्री विषयीचा पारंपरिक दृष्टिकोण व्यक्त होतो. तर ओरबिन मध्ये पडून कंबर मोडून घरात पडलेल्या मनोहरची बायको स्वतःचा संसार विडीच्या पानाला लागणारी कुड्याची पाने विकून करते, हे माहीत असल्याने जंगलात लाकडे गोळा करण्यासाठी गेलेली शेवंता कुड्याचे झाड तोडत नाही. यातून ग्राम जीवनातील सहजतेने व्यक्त होणारा दयाळू भाव ही दिसून येतो. धालो सारखा पारंपरिक उत्सव खेळणाऱ्या महिला, देवाचा प्रसाद घेतल्याशिवाय कोणत्याच गोष्टीची सुरुवात न करणारे गावकरी या सर्वातूनही पारंपरिक ग्रामसंस्कृतीचे दर्शन या कादंबरीत घडते. गावातील जातीय संघर्षाचे चित्रणही काही प्रसंगातून झाले आहे, पण हा संघर्ष तीव्र होणार नाही याची काळजीही सर्व जण घेताना दिसतात. खाण व्यवसाय वाढू लागला तशी वाढू लागलेली दारूची दुकाने, मटक्याचा तेजीत चाललेला व्यवसाय, पत्त्यांचा खुलेआम राजरोस सुरू झालेला जुगार, खाणीतील अपघातातून होणारे मृत्यू, या सर्वांतून ऱ्हासपर्वाला हळूहळू सुरुवात झाल्याचे लेखकाने नेमकेपणाने दाखवून दिले आहे.

या कादंबरीची भाषा हा या कादंबरीचा सर्वात मोठा विशेष आहे. निवेदनसाठी प्रमाण भाषा आणि संवादासाठी स्थानिक बोलीचा वापर करून लेखकाने कादंबरीत जीवंतपणा आणला आहे.

'म्हज्या अळवाक कितली खाज ते म्हाका सांगोक जाय?' किंवा 'घडे भरल्याशिवाय वडे मेळा नात' अशा म्हणीतून, संवादातून या कादंबरीतील एक वेगळे रूप प्राप्त झाले आहे. या कादंबरीत लेखकाने वापरलेले रचनातंत्र आणि भाषा यामुळे ही कादंबरी अधिक प्रभावी झाली आहे. या कादंबरीचे आणखी एक

वैशिष्ट्य म्हणजे खाणीमुळे उद्ध्वस्त झालेल्या गावाचे चित्रण ही कादंबरी करीत असली तरी भविष्याबद्दलचा आशादायक सूर ती व्यक्त करते. बबनच्या, 'आता आमी करप कितें?' या प्रश्नाला अनिलने दिलेले उत्तर भविष्याचे सूचन करणारे आहे. तो म्हणतो, "शिकचे पडटलें मायनिंग हो एकूच व्यवसाय ना या जगान! आणिकूय खूप आसात! होंड, कुंडई, मडकय आतां व्हडल्यो हडल्यो कंपन्यो येतल्यो खय. थंय कराप काम."[३] एकूणच खाण व्यवसाय आणि त्याचे ग्रामजीवनांवर होणारे गंभीर परिणाम चित्रित करणारी ही अत्यंत महत्त्वाची अशी कादंबरी आहे.

**जंगलतोडीने उद्ध्वस्त झालेल्या गावाचे चित्रण 'इदवास'**

सत्तरच्या दशकातील गोवा महाराष्ट्र सीमेवरील जंगलतोडीमुळे उद्ध्वस्त झालेल्या एका गावाची कहाणी चंद्रकांत गावस यांनी 'इदवास' या कादंबरीमध्ये मांडली आहे. जंगल तोडीमुळे फक्त जंगलाचाच विद्ध्वंस होतो असे नव्हे तर त्यामुळे एक गावच कसा उद्ध्वस्त होत जातो आणि त्याबरोबरच त्या गावातील माणसांची कशी वाताहात होते, मानवी मूल्ये कशी गळून पडतात याचे चित्रण चंद्रकांत गावस यांनी या कादंबरीतून केले आहे. तळेपट हा सह्याद्रीच्या कुशीत वसलेला एक गाव. आपली पारंपरिक शेती आणि कुमेरी म्हणून केली जाणारी नाचणीची लागवड यावर गरिबीत पण सुखात जीवन जगणारा एक गाव. या गावाला सह्याद्रीचा भव्य आधार मिळाल्यामुळे जंगलाचे जणू वरदानच मिळाले होते. आणि दरवर्षी याच जंगलातील काही भाग म्हणून त्या ठिकाणी कुमेरी शेती करून नाचणी पिकवणे व त्यावर गुजराण करणारे येथील गावकरी! थोडी शेती होती तेथे भात पिकवले जायचे, तर गुरा-ढोरांची मोठी संपत्ती या लोकांकडे होती. लज्जारक्षणापुरते वस्त्र आणि दोन वेळचे जेवण एवढ्यावर सुख मानून समाधानाने जगणारे हे गावकरी होते. एकमेकांची घरे शाकारणी करण्यापासून, लग्न-कार्यापर्यंत या लोकांची सामुहिकता पहाण्यासारखी होती. भुता-खेताना घाबरणारे, करणी-करतुब यावर विश्वास ठेवणारे, देवचाराला बोकडाचा, कोंबडीचा बळी दिला की तो गावचं रक्षण करतो, अशी पूर्ण श्रद्धा असलेले असे या गावातील गावकरी होते. लाकूड व्यापारातील ठेकेदार गणपत शेडगेचे पाय ज्या दिवशी या गावाला लागले, त्या दिवसापासून या गावच्या अवकळेला सुरुवात झाली. या गावातील जंगलावर या गावातील लोकांचीच मालकी होती. सगळे जंगल किनळ, माडत, नाणा, हेद, हसन, शिशम अशा इमारतीसाठी व बांधकामासाठी उपयुक्त अशा झाडानी व्यापले होते. आणि शेडगे हा या झाडांच्या हव्यासाने या गावात आला होता. सीताराम या

गावातीलच एका बेरकी माणसाला आपल्या हाताशी धरून शेडगे लाकडाचा व्यवसाय सुरू करतो. गावकऱ्यांशी अगदी गोडीगुलाबीने बोलून तो त्यांच्याकडून अगदी कमी पैशात त्यांच्यासोबत करार करतो व त्यांच्या जंगलाने व्यापलेल्या जमिनी मिळवतो. जंगल तोडण्याचे काम गावातील लोकांच्या सहाय्यानेच सुरू होते.

एक-दोन रुपयांचाही दिसवडा न मिळणाऱ्या लोकांना चार-चार रुपये दिसवडा मिळू लागतो आणि पैसा हातात पडू लागल्यावर लोकांची बुद्धी देखील फिरू लागते. बळीराम गुरुजी, बाप्पा, सगुण असे काही या जंगलतोडीला विरोध करण्याचा प्रयत्न करतात पण ज्यांच्या डोळ्यावर पैशाची धुंदी चढली होती त्यांनी हा विरोध मोडून काढला आणि होऊ घातलेल्या विद्ध्वंसाला आमंत्रित केले. जंगल तोडीचे काम सुरू होते त्याच दिवशी गावच्या देवळाचे छप्पर पडते. हा बाप्पा सारख्यांना जंगलतोड सुरू केल्याने देवाचा झालेला कोप वाटतो, पण सीताराम ही दुसऱ्या गावाने आपल्या गावावर केलेली करणी आहे हे गावकऱ्यांना पटवण्यात यशस्वी होतो. सामूहिकतेवर टिकून राहिलेला हा गाव, पण ती सामूहिकता हळूहळू नष्ट होताना दिसते. पडलेल्या देवळाचे छप्पर बांधण्यासाठी घरटी एक माणसाने येण्याचे ठरून देखील जे पुरुष जंगल तोडीला जातात. ते आपल्या बायकाना पाठवून आपण सामुहिक कामाकडे दुर्लक्ष करून आपल्या जंगलतोडीच्या कामावर जातात. या जंगलातील रस्ता करण्यावरून व इतर काही गोष्टींवरून गावात तंटे, बखेडे वाढू लागतात. पैसा येतो आणि त्या सोबत व्यसने येतात. एकही दारूचे दुकान नसलेल्या या गावात चोरट्या पद्धतीने तीन-तीन दारूची दुकाने सुरू होतात. गावातली तरुण पोरे ज्यांना कधी चहा पिऊनही माहीत नव्हता ती दारूच्या अधीन होऊ लागतात. जंगल तोडीचे काम वाढते तसे स्त्रियांनाही कामावर घेतले जाते आणि अनेक अनैतिक गोष्टींनांही सुरुवात होते. इथे मोठ्या प्रमाणात जंगल आहे हे समजल्यावर अनेक ठेकेदारांची नजर गावातील या जंगलावर पडते आणि पैशांचा हव्यास जडलेले गावकरी आपली जंगले त्यांना भराभर देऊ लागतात. याबद्दलचे लेखकाने केलेले वर्णन मार्मिक आहे. तो म्हणतो, "संपत्तीवर डाकूनी धाड घालावी, तसा एक-एक व्यापारी डोंगरावर धाड घालीत होता. गाव शिवाराचे डोंगर उघडे होत होते तसे आत शिरत होते. डोंगरांचे स्वरूप बदलत होते तसा गाव बदलत होता, गावातील माणूस बदलत होता."[४] असे अनेक ठेकेदार गावात येतात आणि गावात जणू हैदोस सुरू होतो. काही ठेकेदार जंगलतोडीसाठी बाहेरून माणसं घेऊन येतात व त्यांच्यात व गावकऱ्यांत संघर्ष

होऊन भांडणांचे प्रकार घडतात. आता लोकांना कुमेरी शेती, उन्हाळी पोरसू करायला वेळ नसतो. खरंतर भातशेती करायची गरजही त्याना वाटेनाशी होते. एरवी गावातील भजनाला गर्दी करणारे लोक सकाळी कामावर जायचं आहे म्हणून देवळाकडे फिरकेनासे होतात. गावातील जत्रेतील, रामनवमीच्या कार्यक्रमातील उत्साह नाहीसा होतो. जंगलतोड हे पाप आहे म्हणणाऱ्या सगुणलाही याच कामावर जाण्याशिवाय पर्याय उरत नाही. एरवी सर्व कामे सामुदायिकपणे करणारे गावकरी, पण एका असाहाय्य म्हातारीचे घर भर पावसात पडते तर ते उभारून द्यायला कोणाला फुरसत होत नाही. गावातील माणुसकी, आपलेपणा, सदाचार आणि एकमेकांवरील विश्वास संपत जात असल्याची अनेक उदाहरणे समोर येऊ लागतात आणि यातूनच गावाचा विद्ध्वंस होतो. या सगळ्याचे अगदी मार्मिक वर्णन लेखकाने केले आहे. गावातील अनैतिक संबंधांची प्रकरणे तर एवढी वाढतात की या गावातील मुलींसोबत आपल्या मुलांची लग्ने जुळवणे आजूबाजूच्या गावातील लोकांना नकोसे वाटू लागते. गावची रया बिघडते. या कादंबरीचा शेवटही जेव्हा पोलीस म्हणून बाहेरच्या गावी ड्युटीवर असलेल्या आबाला आपली बायको आपल्याच घरात भाडेकरू म्हणून रहात असलेल्या रफीकला लागू आहे आणि जन्माला आलेला मुलगा त्याचाच आहे हे समजते तेव्हा तो बायकोला बदडू लागतो, या घटनेतून होतो. एकूणच या जंगलतोडीमुळे जंगलाचा विनाश होतोच, पण त्याच बरोबर पैशाच्या मागे लागलेल्या माणसाचे किती अधःपतन होते हे देखील सहज लक्षात येते.

या कादंबरीतून आलेली नारबा, भोलू, धानू, सातू, भिवा, पायगो या नावावरूनच तत्कालीन ग्रामीण जीवन सहज लक्षात येते. तसेच अनेक आलेल्या दंतकथा, देवचार भूत यांच्या कथा, लोकांचे समज या सर्वांतूनही या कादंबरीतील ग्रामीणता अधिकाधिक गडद होत जाते. पण लेखकाने संवादांसाठी स्थानिक बोलीचा वापर न करता प्रमाण बोलीचा वापर केल्याने कादंबरीतील जीवंतपणा हरवल्याची जाणीव होते. गोमंतकातील अनेक लेखक गोव्यातील भाषिक पर्यावरण लक्षात घेऊन, स्थानिक लोकांच्या बोलीभाषेचा वापर आपल्या लेखनात करण्याचे टाळतात, पण त्यामुळे आपण त्या लेखनाच्या गाभ्याला हातच घालू शकत नाही हे त्यांच्या लक्षात येत नाही. या कादंबरीतही असेच काहीसे झाले आहे. एकूणच जंगलतोडीसारख्या एका वेगळ्या विषयावर बेतलेली व त्यातून होणाऱ्या विनाशाचे चित्रण करणारी ही नव्वदोत्तर काळातील एक महत्त्वाची गोमंतकीय ग्रामीण कादंबरी आहे.

## अनिल परूळेकरांच्या ग्रामीण पार्श्वभूमीवरील कादंबऱ्या

अनिल परुळेकर यांनी ग्रामीण पार्श्ववभूमीवरील दोन कादंबऱ्या लिहिल्या आहेत. या दोन्ही कादंबऱ्यांचे स्वरूप परंपरागत कादंबऱ्यांपेक्षा काहीसे भिन्न आहे. यातील पहिली कादंबरी 'वनराईचा लढा.' ही कादंबरी नवीन औद्योगिक प्रकल्प एखाद्या राज्यात येऊ पाहतात तेव्हा त्या प्रकल्पांना राजकीय पातळीवर विरोध करून ते बंद पाडले जातात, यामुळे गावाचा आर्थिक विकास खुंटतो अशी भूमिका घेऊन ही कादंबरी लिहिलेली आहे. वाढत्या शहरीकरणामुळे आणि औद्योगिकीकरणामुळे गावे कशी आक्रसली जात आहेत, याबद्दलचे वर्णन करणाऱ्या अनेक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत. पण परुळेकर याठिकाणी वेगळा विचार मांडतात गावातील ज्या ओसाड जमिनी आहेत त्या ठिकाणी नवीन उद्योग सुरू झाल्यास गावातील लोकांच्या हाताला काम मिळेल आणि त्यामुळे गावचा आर्थिक विकास होईल, लोकांचे दारिद्र्य संपेल असा विचार ते या ठिकाणी मांडतात. अर्थात ही मांडणी त्यांनी अनोख्या पद्धतीने केली आहे. ही मांडणी करण्यासाठी त्यांनी वनराई हे काल्पनिक राज्य निर्माण केले असून या काल्पनिक राज्यातील 'मारीबून' या काल्पनिक गावाची ही कथा आहे. अर्थात यामुळे त्यातील जीवंतपणा कमी झाला आहे याची जाणीव लेखकालाही आहे. म्हणून प्रस्तावनेतच ''कादंबरीतील सर्व पात्ररचना आणि स्थलकाल वर्णन हे जरी माझ्या सुपीक मेंदूतून उपजले असले तरी माझ्यापेक्षा सुपीक मेंदू असलेला कोणी वाचक, बादरायण संबंध जोडून माझ्या निरुपद्रवी कादंबरीवर कोणाच्या तरी अस्मितेला धक्का पोचवण्याचा आरोप करण्याची शक्यता आहे. असं काही आक्रीत होऊ नये म्हणून मी कादंबरीतील सर्व नामावली मराठी वाचकाला बहुतांशी अपरिचित आणि थोडीफार विचित्र वाटण्याची दक्षता घेतली. त्यामुळे थोडाफार रसभंग होण्याची शक्यता आहे, पण अस्थिभंगापेक्षा रसभंग बरा.''[५] अर्थात यामुळे मूळ आशयापासून कादंबरी काहीशी दूर गेली असली, तरी एक वेगळा प्रयोग म्हणून त्याकडे पाहता येते. तसेच ज्याला गोमंतकातील तत्कालीन राजकीय परिस्थितीची जाणीव आहे तो या घटनांचा संदर्भही नेमकेपणाने जाणून घेऊ शकतो.

शेती या एकाच उत्पन्नावर उपजिविका करणाऱ्या आणि अत्यंत गरिबी असलेल्या वनराई या राज्यातील मारीबून या खेड्यात 'एम्पायर कुंभाट इन्कार्पोरेट' ही कंपनी आपला प्रोजेक्ट सुरू करू पहाते. पण ज्यांच्या हीतसंबंधांना बाधा पोचत आहे असे काही लोक पर्यावरणाचा नाश होईल या नावाखाली या प्रकल्पाला

विरोध करतात. तेवढ्यात सत्तापरिवर्तन होते आणि नवीन मुख्यमंत्री जे सत्तेवर येतात त्यांना हा जुन्या मुख्यमंत्र्यांनी विशेष लक्ष घातलेला प्रकल्प पुढे नेण्याची विशेष आस्था नसते व या सर्व गदारोळात कंपनीला आपला प्रकल्प रद्द करावा लागतो. या कादंबरीतून लेखक हा विचार व्यक्त करताना दिसतो की अशा प्रकल्पांना फक्त विरोधाला विरोध करून आपण आपल्या गावांना विकासापासून वंचित करीत आहोत. गावच्या विकासासाठी असे प्रकल्प आले पाहिजे त्यामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि गावे संमृद्ध होतील. या संदर्भात लेखकाने कादंबरीच्या शेवटी लहानूच्या स्थितीचे केलेले वर्णन प्रातिनिधिक म्हणून घेता येते. ''लहानूला गेले ते दिवस आठवत होते. हातात पडणारी रोख मजुरी, महिनाभर असलेलं काम हे सगळं आता फक्त त्याच्या आठवणीत शिल्लक राहिलं होतं. आता ते सुगीचे दिवस परत दिसणार नव्हते. याचा आनंद हे लोक कसा काय साजरा करत आहेत हे त्याला समजत नव्हतं. आता असं बसून काही काम मिळत आहे काय त्याची वाट बघणं आणि येणारा दिवस कसाबसा ढकलणं ही एवढीच जिंदगी शिल्लक होती.''[६] म्हणजेच प्रकल्पाचे काम वर्षभर चालू असल्याने लोकांना कामधंदा मिळत होता, हातात पैसा येत होता, पण प्रकल्प रद्द झाल्याने हे सर्व संपून दारिद्र्याचे दिवस पुन्हा येणार होते. ग्रामीण कादंबरीतील वेगळा विचार म्हणून या कादंबरीकडे बघता येते, अर्थात औद्योगिक विकासातून खेडी कशी आक्रसली आहेत आणि अनेक ठिकाणी स्थानिक लोकच कसे उघड्यावर पडले आहेत हे पाहिले असता लेखकाची औद्योगिकीकरणातून ग्रामविकासाची संकल्पना हे दिवास्वप्न ठरण्याची शक्यताच जास्त वाटते.

ग्रामविकासाचा मुलभूत विचार मांडणारी 'वाहतं पाणी'

ग्रामविकासाची मूलभूत संकल्पना मांडणारी अशी 'वाहतं पाणी' ही कादंबरी आहे. आपण ही कादंबरी लिहिण्यास उद्युक्त का झालो हे सांगत असताना लेखकाने आपल्या मनोगतात ''शेतीच्या आधुनिक तंत्राच्या एकांगी प्रचारामुळे आज शेतीचे अर्थकारण शेतकऱ्यांच्या हातून पार निसटून गेले आहे. हा विचार सुगम पणे वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ही कादंबरी लिहिण्याचा खटाटोप मला करावासा वाटला,''[७] असे म्हटले आहे. यामधून लेखकाची ही कादंबरी लिहिण्यामागची भूमिका स्पष्ट झाली आहे. या कादंबरीत कोणत्या एका विशिष्ट प्रदेशाचे किंवा गावाचे चित्रण नसले, तरी एकूण ग्रामविकासाची संकल्पना लेखकाने या कादंबरीच्या माध्यमातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी एका कालव्याचे चाललेले बांधकाम व त्या कालव्यावर 'वडगाव मायनर' हा

उपकालवा बांधण्याचे चाललेले काम व त्या ठिकाणी सत्याजी काळे या तरुणाची अभियंता म्हणूनच झालेली नेमणूक, अशा योजनांच्या बांधकामात मोठ्याप्रमाणांत चाललेला भ्रष्टाचार, अधिकाऱ्यांची हेकेखोर वृत्ती, अंतर्गत चालणारे जातीचे राजकरण, विविध खात्यांमध्ये असलेला संयोजनाचा अभाव, नियोजनशून्यता, प्रत्यक्ष लाभाची चुकीची मांडलेली गणिते, फक्त नगदी पिके डोळ्यासमोर ठेवून योजना आखल्याने बिघडणारा पिक उत्पादनाचा समतोल हे सर्व या कादंबरीत मांडले आहे, पण ही फक्त कादंबरीची पार्श्वभूमी आहे. पटेल गुरुजींच्या तोंडातून लेखक जे वदवून घेतो ते सांगण्यासाठीच ही कादंबरी लिहिली आहे. पटेल गुरुजी ही या कादंबरीतील महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. पटेल गुरुजी भारतीय ग्रामव्यवस्थेची मूलतत्वे सांगत असतानाच भारतीय ग्रामव्यवस्थेला अवकळा का प्राप्त झाली याचे विश्लेषणही करतात. त्याचबरोबर ग्रामविकास व्हायचा असेल तर कोणत्या तत्त्वांचा स्वीकार करावा लागेल हेही ते सांगताना दिसतात. एकूणच ग्रामविकासाचा मूलभूत विचार लेखकाने या कादंबरीतून मांडलेला आहे. आपली पारंपरिक शेती कशी होती हे सांगताना, ''निसर्गाशी समन्वय साधून जगणे ही आपली संस्कृती होती. त्यालाच 'अंथरूण पाहून पाय पसरणे' असं म्हणतात. आपल्या गरजा साधनसंपत्तीच्या पलीकडे जाणार नाहीत याची काळजी घेणे यालाच कोणीही कंजूसपणा समजत नसे. आपला शेतकरी तर साधनसामग्री काटेकोरपणाने वापरणारा तज्ज्ञ होता. त्याच्याकडे गाई-म्हशी असत. गरजेपुरत्या दुधाबरोबरच शेतासाठी लागणाऱ्या खताचा पुरवठा त्या करत. पिकाच्या जाती इथल्या मातीशी इमान राखणाऱ्या होत्या. त्या जाती पिढ्यानपिढ्या इथल्याच वातावरणात वाढल्या असल्याने त्या हायब्रीड जातीसारख्या लेच्यापेच्या नव्हत्या. त्यामुळे नव्या नव्या किटकनाशकांचे फवारे मारले नाहीत तरी त्या टिकून रहात. आलेल्या पिकातून बियाणे बाजूला काढून ठेवता येई. शेतात काम करणाऱ्यांच्या हातापायांच्या शक्तीच्या मदतीला बैलशक्ती असे. या सगळ्यांचं अत्यंत हुशारीने नियोजन करून आपला शेतकरी जे काही उत्पादन करत असे ते समाजाच्या मर्यादित गरजा भागवायला पुरेसं असे. जे काही पाहिजे ते निसर्गाकडून अलगद मागून घेणे हीच आपली संस्कृती होती.''[८] हा मूलभूत सिद्धांत विसरल्यामुळेच आपले शेतीजीवन व ग्रामजीवन विस्कटून गेले व स्वयंपूर्ण खेडे ही संकल्पना अडगळीत पडून खेडी कारखान्याला कच्चामाल पुरवणारी केंद्रे झाली. हे लेखकाने या कादंबरीच्या माध्यमातून नेमकेपणाने सांगितले आहे. त्याचप्रमाणे ''पाणलोट क्षेत्राच्या सीमा नैसर्गिक असतात त्या

कधीच बदलता येत नाहीत. आपल्यासारख्या शेतीप्रधान देशात आपण महत्त्वाच्या नद्यांची पाणलोट क्षेत्र ही राज्य ठरवली असती तर पाणीवाटपाचे असे तंटे झाले नसते.''[९] हा विचारही आपल्या राज्यांच्या सीमांच्या संदर्भात खूप महत्त्वाचा वाटतो. एकूणच आज शेतीसाठी जे पाण्याचे दुर्भिक्ष झाले आहे ते आपल्या नियोजनशून्यतेमुळे आहे हे सांगत असतानाच आपणाला आपल्या जमिनी पिकाऊ करायच्या असतील तर आपल्या पूर्वजांनी स्वीकारलेल्या पारंपरिक धोरणांकडे जावे लागेल हे सांगताना पटेल गुरुजी एक मूलभूत विचार सांगतात. ते म्हणतात, ''समुद्राकडे वाहून जाणारे सगळे पाणी आपण जमिनीवरच अडवून ठेवू अशा भ्रमात ते कधीच राहिले नाहीत. त्यांनी प्रयत्न केले ते वाहतं पाणी थबकवायचे, थांबवायचे नाहीत. वाहतं पाणी वाटेत थोडा काळ थबकवून पुढे जाऊ देण्याची जी करामत त्या काळात शेतकऱ्यांनी केली, त्यामधूनच या सगळ्या पिकाऊ जमिनी तयार झाल्या.''[१०] एकूणच 'जलयुक्त शिवार' योजनेचे मूळही या चिंतनातच आहे हे आपल्या लक्षात येईल. शेतीचा असा मूलभूत विचार करणारी मराठीतीलही पहिलीच कादंबरी असावी आणि म्हणूनच ती नव्वदोत्तर काळातील गोमंतकातीलच नव्हे तर एकूण मराठी वाङ्मयातील महत्त्वाची ठरावी अशी कादंबरी आहे.

**ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या आणखी काही कादंबऱ्या**

एन. शिवदास यांची 'भगदाड' ही ग्रामीण परिसरातील अगदी वेगळा विषय हाताळणारी कादंबरी आहे. गोव्यातील खाडीच्या कडेला असलेल्या अनेक गावात खाजनशेती केली जाते. खाजनशेती म्हणजे बांध घालून खारे पाणी जमिनीवर येण्यापासून रोखले जाते आणि त्या मधल्या जागेत शेती केली जाते. हे प्राचीन काळापासून शेती करण्याचे एक वैशिष्ट्यपूर्ण तंत्रज्ञान गोव्यात विकसित झाले आहे. पण आधुनिक काळात काही स्वार्थी लोक हे पारंपरिक बांध मुद्दामहून फोडतात. हे बांध फुटले की त्या शेतीच्या जागेत मोठ्या प्रमाणात मासे मिळतात. अनेक हॉटेलमधून या माशांना मोठी मागणी असल्याने व मासे विकून खूप चांगले पैसे मिळत असल्याने हे बांध मुद्दामहून फोडले जातात. यामुळे काही मोजक्यांचा फायदा होतो. पण या खाजन शेतीवर जे अवलंबून असतात त्यांचे प्रचंड नुकसान होते. या बांधांची दुरुस्ती करणारेही काही मोजकेच लोक आहेत व ही दुरुस्ती करण्यासाठी सरकार घसघशीत रक्कम देत असल्याने या कामाचे ठेके घेणाऱ्यांकडूनही हे बांध मुद्दामहून फोडले जातात. या सर्वांत राजकीय हस्तक्षेपही मोठ्या प्रमाणात होत असतो. हे बांध फोडल्यामुळे एका बेटावरील ही खाजन शेती

करणाऱ्या लोकांचे कसे नुकसान होते याची मांडणी या कादंबरीतून ए. शिवदास यांनी अत्यंत उत्कंठावर्धक पद्धतीने केली आहे. एकूणच अगदी वेगळ्या समस्येवरील ग्रामीण कादंबरी म्हणून या कादंबरीकडे पहाता येते.

नारायण महाले यांच्या 'सावली' या कादंबरीतून एका कुळागराने नटलेल्या गावाच्या पार्श्वभूमीवर एका ढासळणाऱ्या कुटुंबाचे चित्रण लेखकाने केले आहे. गोमंतकीय ग्रामीण जीवनांतील अनेक परंपरा, अनेक लोकसमज, तत्कालीन एकत्र कुटुंबपद्धती या सर्वांचे दर्शन या कादंबरीतून घडते.

अजूनही ग्रामीण पार्श्वभूमीवरील काही गोमंतकीय कादंबऱ्यांचा उल्लेख करता येईल पण लेखाची मर्यादा लक्षात घेता गोमंतकीय ग्रामीण जीवनांतील ठळक प्रवृत्ती ज्या कादंबऱ्यांतून व्यक्त झाली आहे किंवा काळाच्या संदर्भात ज्या कादंबऱ्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे, त्या कादंबऱ्यांचा या विश्लेषणात समावेश केला आहे.

निष्कर्ष आणि समारोप

वरील एकूण विश्लेषणांवरून हे सहज लक्षात येईल की गोमंतकीय मराठी कादंबरी ही समकालीन मराठी कादंबरीला समांतर असली तरी नव्वदोत्तर गोमंतकीय ग्रामीण कादंबरीचे स्वरूप समकालीन मराठी ग्रामीण कादंबरीचा विचार करता काहीसे भिन्न आहे. शेती म्हणजे आतबट्याचा झालेला व्यवसाय, कर्जबारी शेतकऱ्यांच्या आत्महत्या, मालाला उचल नसल्याने हतबल झालेला शेतकरी, ओल्या आणि सुक्या दुष्काळामुळे जगण्याचा प्रश्न निर्माण झालेला शेतकरी हे विषय गोमंतकीय ग्रामीण कादंबरीतून दिसत नाहीत. याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे गोव्यातील जवळपास सत्तर टक्के शेतजमीन आता सध्या पडीक आहे, कारण शेती करण्यापेक्षा रेशनवर मिळणारा तांदूळ स्वस्त पडतो. शेती व्यतिरिक्त सहज पैसा मिळवून देणारे इतर उद्योग मोठ्या प्रमाणांत निर्माण झाले आहेत. त्यामुळे शेतीसारखे कष्टदायक काम करण्याची कोणाला आवश्यकता उरलेली नाही. गोव्यात सुपारी, नारळ, केळी, काजू यांच्या बागायती मोठ्या प्रमाणांत आहेत आणि ते उत्पन्न रानटी जनावरांच्या वाढत्या त्रासामुळे सहजासहजी हाताला मिळणे कठीण झाले आहे, पण बहुतेक बागायतदारांचा दुसरा जोडधंदा असल्याने या सर्वांची झळ तेवढ्या तीव्रतेने त्यांना जाणवत नाही. तसेच गोवा आकाराने छोटे राज्य असल्याने सरकारी योजना लोकांपर्यंत सुलभतेने पोचतात व नुकसान भरपाई देखील मिळत असल्याने जी झळ महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील शेतकऱ्याला सोसावी लागते व शेती हा त्याच्या जीवनमरणाचा प्रश्न होतो तो तेवढ्या तीव्रतेने

गोमंतकीय शेतकऱ्यांना, बागायतदारांचा होत नाही. असे असले तरी फक्त जे शेती व बागायतीवर अवलंबून असलेले शेतकरी आहेत, त्यांचे जीवन कष्टमयच आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात शेतकऱ्यांच्या जगण्याचे दुःख मांडणाऱ्या वा त्यांच्या जगण्याचा संघर्ष मांडणाऱ्या कादंबऱ्यांची निर्मिती निश्चितपण होईल, तसेच आज ड्रग्सचे लोण गोमंतकातील गावागावात पोचू लागले आहेत. बेकारीचे प्रमाण गोव्यातही मोठ्याप्रमाणात वाढत आहे. स्थानिक व बाहेरून येऊन या ठिकाणी स्थानिक झालेले लोक यातील संघर्षही काही भागात दिसत आहे. ग्रामीण कादंबरी ही वास्तववदर्शी असल्याने हे विषय केंद्रस्थानी ठेवून आगामी काळात कादंबरी लेखन होणं शक्य आहे.

**संदर्भ:**


१) प्रभुदेसाई, विद्या, '१९९० पूर्वीची गोमंतकीय मराठी कादंबरी एक चिकित्सक अभ्यास', शारदीय वितरण, पणजी, पृ. ८

२) देसाई, गजानन, 'ओरबिन', यश अमृत प्रकाशन, साखळी- गोवा, २०२०, पृ. ६५

३) देसाई, गजानन, (उनि) पृ. २०७

४) गावस, चंद्रकांत, 'गौराई प्रकाशन', होंडा- गोवा, २०१८, पृः १२०

५) परूळेकर, अनिल, 'वनराईचा लढा' गोमंतक मराठी अकादमी, आल्त पर्वरी, २००६ पृ.९

६) परूळेकर, अनिल, (उनि) पृ. १७४

७) परूळेकर, अनिल, 'वहातं पाणी', गोमंतक मराठी अकादमी, आल्त- पर्वरी, २००९, पृ. (मनोगत)

८) परूळेकर, अनिल, 'वहातं पाणी' गोमंतक मराठी अकादमी, आल्त- पर्वरी, २००९, पृ.ः १९१,१९२

९) परूळेकर, अनिल, (उनि) पृ. २२३

१०) परूळेकर, अनिल,(उनि) पृ. २०७